पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक :नस/४/कावि/२५६/२०२१
दिनांक : २८/०५/२०२१

प्रति,

मा.......................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची **पाक्षिक** सभा दि.**०४/०६/२०२१** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची **पाक्षिक** सभा **शुक्रवार** दिनांक **०४/०६/२०२१** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील मा.सभापती, विधी समिती यांचे दालनातून मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) मा.सभापती सभा संचालित करणार आहेत. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**( चंद्रकांत इंदलकर )**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.विधी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १३**

**दिनांक : ०४/०६/२०२१** **वेळ : दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची **पाक्षिक** सभा **शुक्रवार,** दिनांक **०४/०६/२०२१** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील मा.सभापती, विधी समिती यांचे दालनातून मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) मा.सभापती, सभा संचालित करणार आहेत. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक **०७/०५/२०२१** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १२)** चा सभावृत्तांत कायम करणे.

-----------

विषय क्र.१) काळेवाडी फाटा येथे वाकड कस्पटेवस्ती ते पिंपरी (काळेवाडी) ग्रेड सेपरेटर बांधणे या प्रकल्पाकरीताचे स्थापत्य विषयक कामे अद्यापही सुरू झालेले नसल्याने, सदर प्रकल्पासाठी विद्युत विषयक कामे करणे सद्यस्थितीत शक्य होत नाहीत. काळेवाडी फाटा येथे वाकड कस्पटेवस्ती ते पिंपरी (काळेवाडी) ग्रेड सेपरेटर बांधणे या प्रकल्पाकरीताचे विद्युत विषयक कामे करणेचे स्विकृत नि.र.रू.१,५०,७१,५२६/- (अक्षरी र.रु.एक कोटी पन्नास लाख एक्काहत्तर हजार पाचशे सव्वीस फक्त) चे कामाचे आदेश एजन्सी मे.श्री ओम इलेक्ट्रीकल्स यांना दि.०१/०३/२०१९ रोजी देण्यात आले आहेत. एजन्सीने सदर कामाकरीता वापरावयाचे एचटी केबल, आरएमयु, एलईडी फिटींग, एलटी केबल व पाईपचा पुरवठा केलेला असुन या कामाचे कमाल खर्च मर्यादेनुसार र.रू.७२,२४,७५९/- इतकी रक्कम शिल्लक आहे. सदर प्रकल्पाकरीता आवश्यक जागा अद्यापही न्यायप्रविष्ठ असल्याने सदरच्या प्रकल्पाचे स्थापत्य कामे सुरू करणेचा कालावधी निश्चित करणे शक्य होत नसल्याचा बीआरटीएस स्थापत्य विभागाकडुन अभिप्राय प्राप्त झालेला आहे. त्यामुळे सदर प्रकल्पासाठी आवश्यक विद्युत विषयक कामे करणे सद्यस्थितीत शक्य होत नाहीत. या प्रभागाचे स्थानिक मा.नगरसदस्य यांनी याच प्रभाग क्र.२६ मधील कस्पटेवस्ती स्मशान भूमी जवळील पुणे मनपा मार्फत उभारण्यात येत असलेल्या नदीवरील पुलाचे बांधकामात पिंचिंमनपा हद्दीतील अडथळा करणारे तसेच बीआरटीएस रस्त्यावरील कस्पटे चौक ते वाकड चौक या रस्त्यावरील फुटपाथमधील उच्चदाब विजवाहिन्यांमुळे अपघात होऊन नागरिकांचे जिवीतांस धोका होण्याची शक्यता असल्याने त्वरित भुमिगत करणेकामी विनंती केली आहे. त्याचप्रमाणे प्रभाग क्र. २६ मधील नाशिक फाटा ते वाकड बीआरटीएस या

रस्त्यावरील दिव्यांच्या नादुरूस्त केबल बदलणे तसेच काळेवाडी फाटा येथाल ब्रिज करीताच्या नादुरूस्त एल ई डी फिटींग बदलणे अत्यावश्यक आहे. सदरची कामे उपरोक्त विषयांकीत कामातून करून घेणे शक्य होणार आहे. उपरोक्त नमूद प्रमाणे सदरची कामे विषयांकीत कामातून करून घेतल्यास होणारा खर्च हा या कामाचे कमाल खर्च मर्यादेतच होणार आहे. सबब उपरोक्त नमूद कामे करणे करीता विषयांकीत कामाचे स्थळबदलास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) हिंजवडी फेज २ येथे ई-बसेस चार्जिंग करणेकामी आवश्यक असणारी विद्युत यंत्रणा बसविणे कामी म.रा.वि.वि.कं. कडील कोटेशन प्रमाणे काम करून मिळणे बाबत मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांनी पत्र क्रमांक पीएमपीएमएल/सीएमडी/विद्युत/२३२७/२०२० दिनांक - २६/१०/२०२० रोजी चे पत्रान्वये कळविले आहे. सदर ठिकाणचे मराविवि कं कडील ३००० केव्हीए क्षमतेचे चार्जिंग स्टेशन उभारणीचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. सदर कामासाठी दि.०२/०२/२०२१ रोजी पीएमपीएल चे प्रतिनिधी श्री.कोळेकर यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून त्या बाबत पिंपरी चिंचवड महानगर पालिका विद्युत विषयक कामासाठी वापरत असलेल्या दरसुची प्रमाणे अंदाजपत्रक तयार केले असता सदर कामासाठी र.रू.१ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सदर र.रू.१ कोटी इतक्या रकमेस प्रशासकिय मान्यता मिळणेस तसेच म.रा.वि.वि. कं. कडील कोटेशन प्रमाणे सदर ठिकणी उच्चदाब ग्राहक होणे कामी मराविवि कंपणीस र.रू.९८ लक्ष अदा करणेस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( चंद्रकांत इंदलकर )**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२५६ /२०२१
दिनांक : २८/०५/२०२१चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.